# नात जन्मभराच, बाप लेकीच......

काय सांगाव या बाप – लेकीचं
नातं ?
भाव – बंध सीमा या नात्याची
अथांग पामराच्या किनाऱ्याची.
भले, आईचा श्वास असूदे,
पण बापाच्या काळजाचा ठोका
म्हणजे लेक.



चिमुकल्या हस्तस्पर्शाने झालेलं,
अंधारलेल्या भविष्याच
निरसन म्हणजे लेक,
अंगणात बागडणारं, बापाच
लहानस वैभव म्हणजे लेक.

बापाच्या सोनेरी कौदणातं
संजलेला शृंगार म्हणजे लेक,
परक्याचं धन जरी, तरी केलेलं
माहेराच सोन म्हणजे लेक.

बापाची अस्मिता, अन् त्याच्या
समृद्धीचं औषण म्हणजे लेकत्र
चैतन्याच्या आहेराचं,बापाचं
समाधान
पुरेपुर म्हणजे लेक,
अन्
जीवापाड जपलेल्या ठोक्याचं
कन्यादान सुख म्हणजे लेक.

कु.भक्ती चंद्रकांत पानसरे
बी.एस्सी भाग – २
फॉरेन्सिक सायन्स